**<u>समय मर्यादित/प्रथम प्राधान्याचे</u>**

**विभागीय कृषि सहसंचालक नाशिक.विभाग नाशिक कार्यालय**

दुरध्वनी क्र. ०२५३-२९५७४८०-८५ ई-मेल- jdanashiktransfer@gmail.com

# समुपदेशन बदली प्रक्रिया सन-२०२१

# -: परिपत्रक :-

क्रमांक जा.क्र विना/आस्था/बदली/अ-३/२५५२/२०२१. दिनांकः- २२ जुलै २०२१

**वाचाः-** **१)** जाक्र विना/आस्था/बदली/अ-३/१४०२/२०२१ दिनांक ३१ मार्च २०२१
**२)** जाक्र विना/आस्था/बदली/अ-३/१५६५/२०२१ दिनांक २० एप्रिल २०२१
**३)** शासन निर्णय क्रमांक एसआरव्ही-२०२१/प्र.क्र.२०/कार्या-१२ दिनांक ०९ जुलै २०२१
४) विकृसस कार्यालयाचे परिपत्रक क्रमांक जा.क्र विना/आस्था/बदली/अ-३/२४८५/२०२१. दिनांकः- १५ जुलै २०२१

---

अधिनस्त सर्व कार्यालयातील सर्व कर्मचाऱ्यांना या परिपत्रकाव्दारे सुचित करण्यात येते की, उपरोक्त संदर्भिय ३ च्या दिनांक ०९ जुलै २०२१ च्या शासन निर्णयानुसार सर्वसाधारण बदल्यांची कार्यवाही दिनांक ३१ जुलै २०२१ पर्यंत पूर्ण करावयाची आहे. त्याअनुषंगाने विभागीय कृषि सहसंचालक नाशिक अधिनस्त गट-क, **कृषि सहाय्यक** संवर्गाच्या बदल्यांची कार्यवाही समय मर्यादेत करावयाची आहे.

उपरोक्त संदर्भिय २ नुसार यापुर्वी नाशिक संभागातील नियतकालीक बदलीपात्र कृषि सहाय्यक कर्मचारी (अवघड/बिगर अवघड), रिक्त मुख्यालयांची माहिती यापुर्वी संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यांत आली आहे.

तदर्थ पदोन्नती, कायमस्वरूपी समावेशन, मयत कर्मचारी इत्यादी कारणांमुळे दिनांक २१ जुलै २०२१ स्थित कृषि सहाय्यक रिक्त मुख्यालयांच्या संख्येत वाढ झालेली आहे.

त्यामुळे अद्ययावत रिक्त मुख्यालयांच्या यादी या परिपत्रकासोबत प्रदर्शित करण्यांत येत आहे. सद्यस्थितीत नव्याने कृषि सहाय्यक मुख्यालय उपलब्ध झाल्यामुळे बदलीपात्र कर्मचाऱ्यांना खालीलप्रमाणे सूचना देण्यात येत आहेत.

**१)** यापुर्वी दिनांक २६ एप्रिल २०२१ अखेर ज्या बदलीपात्र कर्मचाऱ्यांनी बदली विकल्प अर्ज सादर केलेले आहेत व विकल्प अर्जात बदल करू इच्छित नाही अश्या कर्मचाऱ्यांनी नव्याने अर्ज सादर करू नयेत.

**२)** यापुर्वी दिनांक २६ एप्रिल २०२१ अखेर ज्या बदलीपात्र कर्मचाऱ्यांनी बदली विकल्प अर्ज सादर केलेले आहेत मात्र, नव्याने उपलब्ध झालेल्या मुख्यालयांची मागणी करून नव्याने बदली विकल्प अर्ज सादर करू इच्छितात अश्या कर्मचाऱ्यांनी **दिनांक २४ जुलै २०२१** अखेर सुधारीत बदली विकल्प अर्ज विहीत नमून्यात (परिशीष्ट १ सोबतचे विवरणपत्र-१) विभागीय कृषि सहसंचालक कार्यालयाच्या ई-मेल आयडी jdanashiktransfer@gmail.com वर केवळ ई-मेल व्दारे थेट सादर करावयाचा आहे.

**३)** ज्या कर्मचाऱ्यांना विशेष बाब म्हणून मुदतपुर्व बदलीच्या अनुषंगाने अर्ज सादर करावयाचे आहेत अश्या कर्मचाऱ्यांनी **दिनांक २४ जुलै २०२१** अखेर मुदतपुर्व बदलीचे अर्ज विभागीय कृषि सहसंचालक कार्यालयाच्या ई-मेल आयडी jdanashiktransfer@gmail.com वर केवळ ई-मेल व्दारे सादर करावयाचे आहेत.

**<u>सोबतः- कृषि सहाय्यक रिक्त मुख्यालय माहिती.</u>**
**दिनांकः- २२/०७/२०२१**

**(संजिव गोवर्धन पडवळे)**
**विभागीय कृषि सहसंचालक**
**नाशिक विभाग नाशिक**

---

**प्रत,**

**अधिनस्त सर्व कार्यालय,**

**२/- सदर सूचना आपल्या अधिनस्त सर्व बदलीपात्र कर्मचाऱ्यांना निदर्शनांस आणून देण्यात याव्यात.**